सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

# विज्ञान महाविद्यालय, सांगोला.

## नोटीस

दिनांकः १३-०६-२०२२

### बी. एस. सी भाग - १ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना

=========================================

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रवेश प्रक्रिया दिनांक ०९-०६-२०२२ पासून ऑनलाइन पद्धतीने व खालील नियमानुसार सुरू होत आहे. यासाठी प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील फ्लो चार्ट, माहिती पुस्तक व संबंधित नोटीस काळजीपूर्वक वाचाव्यात, जेणेकरून कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. विद्यार्थ्यांनी प्रवेश कसा घ्यावा यासाठी नोटीस सोबतचा चार्ट अगोदर अवश्य वाचावा आणि काळजीपूर्वक ऑनलाइन फॉर्म भरावा.

✓ बी. एस. सी. भाग - १ साठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी "प्रवेश पूर्व नोंदणी अर्ज" भरावा.

✓ प्रवेश पूर्व नोंदणी अर्ज म्हणजेच गूगल फॉर्म
( https://forms.gle/Bai5HmEyayYrwVYk9 ) हा भरावा.

✓ प्रवेशपूर्व नोंदणी अर्ज दिनांक २०-०६-२०२२ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत भरावा.

✓ दिनांक २१-०६-२०२२ रोजी सर्व नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (http://vmssangola.org/)प्रसिद्ध होईल.
गुणवत्तेच्या व सामाजिक, समांतर आरक्षणाच्या आधारे विद्यापीठ व शासनाच्या नियमानुसार प्रवेशाची गुणवत्ता यादी जाहीर होईल.

✓ दिनांक २२-०६-२०२२ रोजी सकाळी ०९:०० वा. पासून ते दिनांक २४-०६-२०२२ दुपारी ४:०० वा. रोजी पर्यंत गुणवत्ता यादीतील सर्व विद्यार्थ्यांनी या (http://institutebackbone.in/) संकेतस्थळावरील जाऊन ऑनलाइन पद्धतीने नाव

ोंदणी करून त्यावरील व्हि पी आर एन म्हणजेच यूजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा.

✓ बिनचूक ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी सायबर कॅफे अथवा स्वतःचा मोबाईल अथवा लॅपटॉप वरून भरले तरी चालेल अथवा विद्यार्थ्यांच्या गैरसोय होऊ नये म्हणून महाविद्यालयांमध्ये नाममात्र फी घेऊन ऑनलाइन पद्धतीने फॉर्म भरण्याची व्यवस्था केली आहे.

✓ ऑनलाइन भरलेल्या प्रवेश फॉर्म च्या प्रिंट सोबत आवश्यक ती मूळ कागदपत्रे जोडून, आपला प्रवेश २४ तासांच्या आत प्रा. डॉ. ठोंबरे सर (बी. एस. सी. भाग - १ प्रवेश समिती चेअरमन) यांचेकडून व्हेरिफाय करून घ्यावा.

✓ तसेच व्हेरिफाय केलेला प्रवेश अर्ज रीतसर कार्यालयामध्ये संबंधित क्लार्क कडे फी भरून जमा करावा.

✓ फॉर्म जमा करतेवेळी, आपण जमा केलेली एकूण फी आणि कार्यालया मार्फत प्राप्त झालेली फी ची पावती, योग्य असल्याची खात्री करावी.

या पद्धतीने संपूर्ण फी भरल्यानंतर आपला प्रवेश निश्चित होईल.

✓ दिनांक २५-०६-२०२२ पासून प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना मोकळ्या जागेवर, गुणवत्ता व सामाजिक तसेच समांतर आरक्षण आधारे प्रवेश दिला जाईल. (या काळात प्रवेश न घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशा वरील आपला हक्क संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.)

✓ प्रवेशाबाबत चे अंतिम निर्णय महाविद्यालयाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

<u># प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे #</u>

१) इयत्ता १२ वी चा शाळा सोडल्याचा दाखला व त्याच्या दोन झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.

२) इयत्ता १२ वी चे मूळ गुण पत्रकाच्या दोन झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.

३) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

४) विद्यार्थ्यांचे आधार कार्ड झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.

) इयत्ता दहावीचे बोर्ड प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

टीपः
१) सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी त्यांचा शाळा सोडल्याच्या दाखल्याची किमान पंधरा झेरॉक्स प्रती काढून ठेवाव्यात.
२) ऑनलाईन प्रवेश घेत असताना प्रवेश अर्जावर स्वतःचा ई-मेल आयडी व वापरातील मोबाईल नंबर लिहिणे अनिवार्य आहे.

$ हेल्पलाइन नंबरः (०२१८७)-२२०५०८, ९८९०७७६५८५, ९७६५८५११७१, ९४२१०४५९८७

बी. एस. सी. भाग - १ संबंधित महत्त्वाच्या लिंक्सः
१) प्रवेश पूर्व अर्जः ( https://forms.gle/Bai5HmEyayYrwVYk9 )
२) महाविद्यालयाचे संकेत स्थळः (http://vmssangola.org/)
३) ऑनलाइन प्रवेश अर्ज भरणेसाठी संकेत स्थळः (http://institutebackbone.in/)
४) व्हॉट्स ऍप ग्रुप मध्ये समाविष्ट करणेसाठीः
(https://chat.whatsapp.com/GAWe01EAtyV0KnCYdmnfLg)
====================

डॉ. जगन्नाथ ठोंबरे,
चेअरमन,
बी. एस. सी. भाग १,
प्रवेश प्रक्रिया

डॉ. आर. ए. फुले,
प्रभारी प्राचार्य
विज्ञान महाविद्यालय, सांगोला.